## स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३.२३०९७१०, **E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

# प्रेसनोट

दिनांक:- १९/०५/२०१८

**चांदवड चौफुली परिसरात दरोडेखोर व पोलीसांचा थरार**
**०८ दरोडेखोरांना स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने हत्यारांसह केले जेरबंद**

---

नाशिक परिक्षेत्राचे **विशेष पोलीस महानिरीक्षक मा. श्री. विनयकुमार चौबे सो** यांचे आदेशान्वये परिक्षेत्रातील पाचही जिल्हयांमध्ये अवैधरित्या शस्त्रे बाळगणारे इसमांवर कारवाई करणेसाठी विशेष मोहिम राबविली जात आहे. दरम्यान नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे सो.**, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो** यांनी जिल्हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगारांचे सध्याचे वास्तव्य, तसेच अलीकडील काळात दाखल झालेल्या मालाविरुध्दचे गुन्हयांमधील सराईत गुन्हेगारांची शस्त्रे वापरुन गुन्हा करण्याची पध्दत याबाबत आढावा घेवुन सत्वर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी त्यांचे पथकास जिल्हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार, तसेच अवेध शस्त्रांची देवाण-घेवाण करणारे इसमांबाबत गोपनीयरित्या माहिती घेणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक १८/०५/२०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर चांदवड परिसरात गस्त घालत होते, दरम्यान स्थागुशाचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांना खब-यांमार्फत बातमी मिळाली की, मालेगाव शहाराकडुन ०७ ते ०८ इसम सफेद रंगाचे पिकअपमध्ये दोन मोटर सायकल टाकुन काहीतरी गंभीर गुन्हा करण्याचे उद्देशाने नाशिक बाजुकडे येत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी चांदवड चौफुली परिसरात सापळा रचुन नाशिक बाजुकडे येणारे बोलेरो पिकअप वाहनाचा तपास सुरु केला. दरम्यान मध्यरात्रीचे सुमारास मालेगाव बाजुकडुन एक सफेद रंगाची पिकअप गाडी येतांना दिसली, सदर वाहनाचा गतिरोधकाजवळ वेग कमी झाल्याने पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी गाडी थांबविण्याचा प्रयत्न केला असता, चालकाने सदरचे वाहन भरधाव वेगाने चालवुन पुढे घेवुन गेला, दरम्यान पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पाठलाग करुन सदर वाहन अडविले. सदर वाहनावरील चालक व ०३ इसमांना जागेवरच ताब्यात घेण्यात आले, तसेच मागे बसलेले ०४ इसमांनी गाडीचे खाली उडया मारुन पळण्याचा प्रयत्न असता पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमांना सदर बोलेरो पिकअप व त्यामधील ०२ मोटर सायकलबाबत विचारपुस केली असता त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे दिल्याने सदर वाहनाची बारकाईने झडती घेतली असता, **०१ गावठी बनावटीचे पिस्टल, ०१ जिवंत काडतुस, ०२ धारदार चॉपर, ०१ तलवार, ०१ लोखंडी टॉमी, ०२ मिरचीची पुड असलेले पॅकेट** असे साहित्य मिळुन आले.

ताब्यात घेतलेले इसम नामे **१) अजिजु रहेमान आतिक अहमद,** वय ३७, रा.दरेगाव, मालेगाव, **२) मोहमद रफिक मोहम्मद युनूस,** वय ३२, रा.जमहुर नगर, मालेगाव, **३) मोहमद मुन्नवर मोहम्मद फारुख,** वय ३२, रा. इस्लामिया कॉलनी, मालेगाव, **४) लईक अहमद अन्सार अहमद,** वय ३०, रा. म्हाळदे शिवार, मालेगाव, **५) आसिफ खान उस्मान खान,** वय ३२, रा. मदनीनगर, मालेगाव, **६) शेख सईद शेख मज्जीद,** वय ३२, रा. इस्लामिया कॉलनी, मालेगाव, **७) मोहम्मद इस्माईल मोहम्मद इस्त्राईल,** वय २९, रा.नुमानी नगर, मालेगाव**, ८) आरीफ अहमद मोहम्मद हुसेन,** वय २६, रा. चंदनपुरी, मालेगाव अशांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता सदर **टोळीचा म्होरक्या अजिजु रहेमान** याचे पुर्व नियोजनाप्रमाणे वरील सर्व आरोपी हे मालेगाव ते नाशिक महामार्गावरील एखादे मालवाहु वाहन अडवुन लुटमार करणार असल्याची कबुली दिली आहे.

ताब्यात घेतलेले आरोपीतांचे कब्जातुन **०१ बोलेरो पिकअप, ०१ हिरो एचएफ डिलक्स, ०१ होण्डा युनिकॉर्न, असे ०३ वाहने, ०१ गावठी बनावटीचे पिस्टल, ०१ जिवंत काडतुस, ०२ धारदार चॉपर, ०१ तलवार, ०१ लोखंडी टॉमी, ०२ मिरचीची पुड असलेले पॅकेट** असे साहित्य साधने तसेच **सॅमसंग कंपनीचे ०९ मोबाईल फोन** असा **एकुण ३ लाख ६७ हजार ६५० रू.** किंमतीचा **मुद्देमाल जप्त** करण्यात आला. वरील आरोपी हे सर्व सराईत गुन्हेगार असुन त्यांना चांदवड परिसरात महामार्गावर कोठेतरी दरोडा टाकण्याचे तयारीत असतांना स्थागुशाचे पथकाने ताब्यात घेतले असुन त्यांचेविरूध्द **चांदवड पोलीस ठाणेस I गुन्हा रजि. नं. ८९/२०१८ भादवि कलम ३९९, सह भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ व ४/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील सर्व आरोपी हे मालेगाव शहरातील सराईत गुन्हेगार असुन त्यांचे टोळीचा म्होरक्या अजिजु रहेमान याचेवर गुजरात राज्यासह मालेगाव शहरात चोरी व लुटमारीचे गुन्हे दाखल आहे. तसेच त्याचे इतर साथीदारांविरूध्द मालेगाव शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये खुन, खुनाचा प्रयत्न, चोरी, तसेच गंभीर दुखापतीचे गुन्हे दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीतांकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन त्यांना जप्त मुद्देमालासह चांदवड पोलीस ठाणेस हजर करण्यात आले असुन पुढील तपास चालु आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा**ो. यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सहायक पोलीस निरीक्षक **श्री. राम कर्पे,** पोलीस उपनिरीक्षक **स्वप्निल नाईक,** सपोउनि अरूण पगारे, सपोउनि शांताराम लहाणे, पोहवा दिपक आहिरे, संजय गोसावी, पोकॉ मंगेश गोसावी, सुशांत मरकड, गणेश नरोटे, रविंद्र टर्ले, हरीष आव्हाड, हेमंत गिलबिले अशांचे पथकाने सदर कारवाई केली आहे.